आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील उपायुक्त समाज कल्याण संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेबाबत/ बदल्यांबाबत...

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन आदेश क्रमांकः सकआ - २०१८/प्र.क्र.४३७/ आस्था-२

मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१९.

<u>वाचा</u> :- शासन आदेश, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सकआ-२०१८/प्र.क्र.१९२/आस्था-२, दि.१७.११.२०१८

<u>शासन आदेश :-</u>

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या नियम-४ मधील तरतुदीनुसार समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या उपायुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ संवर्गातील खालील अधिकाऱ्यांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने बदल्या करण्यात येत असून, त्यांच्या नावासमोरील स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या कार्यरत ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे ठिकाण	अभिप्राय
१	२	३	४	५
१	श्री.अरविंद वळवी	नियुक्तीच्या प्रतिक्षेत	उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलढाणा	प्रशासकीय कारणास्तव
२	श्रीमती वृषाली शिंदे	उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलढाणा	उपायुक्त (नियोजन), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे	विनंतीनुसार
३	श्री.नितीन ढगे	उपायुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे	उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे	विनंतीनुसार
४	श्री.वासुदेव पाटील	उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे	उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे	विनंतीनुसार
५	श्री.संजय कदम	उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अकोला	उपायुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे	विनंतीनुसार

२. सद्य: स्थितीत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.नितीन ढगे यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. सदर अतिरिक्त कार्यभार शासनाच्या पुढील आदेशापर्यंत कायम राहील.

३. प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे -

१) प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांस तात्काळ कार्यमुक्त करावे.

२) संबंधित अधिकाऱी रुजू होण्यासाठी आल्यावर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. अधिकाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतीक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्‍भवल्यास संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांस जबाबदार धरण्यात येईल.

३) प्रस्तुत आदेशात बदल करुन घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अधिकारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

४. प्रस्तुत शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५३०१९३३०७६२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2019.05.30 19:39:32 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी (आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत)

प्रत,

१) आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
३) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण
४) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण, संस्था पुणे
५) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
६) सर्व अध्यक्ष/सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/बुलढाणा/अकोला/ ठाणे
९) मा.मंत्री (सा.न्या. व वि.स.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) मा.राज्यमंत्री (सा.न्या. व वि.स.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा.प्रधान सचिव (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२) निवडनस्ती आस्था-२.